औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची मंगळवार दिनांक २८/९/९३ रोजी झालेल्या ८६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

---

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वरराव भोसीकर | सभापती औरंगाबाद मंडळ |
| २] श्री. भास्कर मुंढे | उपसभापती, औरंगाबाद मंडळ |
| ३] श्री. दे. हि. मुन, उपसंचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग, औरंगाबाद. | सदस्य, औरंगाबाद मंडळ |
| ४] श्री. व्यंकटराव देशपांडे, उर्फ बबरु चारठाणकर | सदस्य औरंगाबाद मंडळ. |

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद हे बैठकीस अनुपस्थीत होते.

विषय क्र. १: दिनांक १९. ८. १९९३ रोजी झालेल्या ८५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

ठराव क्र. ५०४ दिनांक २८/९/९३

औरंगाबाद मंडळाच्या दिनांक १९/८/१९९३ रोजी झालेल्या ८५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवर सविस्तर चर्चा होऊन सदर कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.

विषय क्र. २: गारखेडा येथील स. न. ५४ मधील ४४४ गाळ्यापैकी काही गाळ्याचे सेप्टीक टँक साफ करणे व काही गाळ्याचे नविन सेप्टीक टँक बसविणे.

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५०५ दिनांक २८/९/९३

गारखेडा येथील ४४४ गाळेधारकांकडून पाणीपुरवठा शुल्कापोटी घेण्यात येणारे रु. ६ यात आणखी १० रुपयाची वाढ करुन तेथील ड्रेनेजची लाईन व सेप्टीक टँकची दुरुस्ती व देखभाल करण्यात यावी व तसे गाळेधारकांना कळविण्यात येऊन दरमहा रु. ६+-१०= १६ याप्रमाणे सेवाशुल्कापोटी वसुल करण्यात यावेत.

विषय क्र. ३: आर २७ सिडको औरंगाबाद येथील मध्यम उत्पन्न गटांतर्गत ८८ गाळ्यांच्या योजनेसाठी प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय देण्याबाबत.

या विषयावर चर्चा करतांना मंडळाच्या सदस्यांनी मत प्रदर्शित केले की, आर २७ सिडको औरंगाबाद येथील मध्यम उत्पन्न गटांतर्गत ८८ गाळ्यांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेली निम्नतम दराची निविदा ही जास्त दराची आहे. त्यामुळे गाळ्यांच्या किंमतीत जास्त वाढ होणार आहे.

उपसभापतींनी मंडळाच्या निदर्शनास आणून दिले की, शासन निर्णयानुसार ठेकेदारांना सुरुवातीपासूनच एस्केलेशन देण्यांत येणार आहे व मंडळातर्फे सिमेंट पुरवठाही करण्यांत येणार आहे. यामुळे कमी दराच्या निविदा प्राप्त व्हावयास पाहिजे होती. या कामासाठी प्राप्त झालेली निम्नतम दराची निविदा प्रचलित ९२-९३ च्या दरसूचीवर ५.४०%जादा येते.

यावर मा. सभापतींनी सांगितले की, निम्नतमदराचे निविदा धारक मे. शामा कन्स्ट्रक्शन कंपनी, मुंबई यांच्या प्रतिनिधीस चर्चेसाठी बोलविण्यांत यावे.

मे. शामा कन्स्ट्रक्शन कंपनी मुंबई यांच्या प्रतिनिधीस मंडळा समोर वाटाघाटीसाठी बोलविण्यांत आले.

मा. सभापतींनी त्यांना सांगितले की, आपण जी निविदा दिलेली आहे ती जास्त दराची आहे.

यावर मे. शामा कन्स्ट्रक्शन कंपनीचे प्रतिनिधींनी सांगितले की, सदर निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या डीएसआरला ५% जास्त येते व बाजार भावही वाढत आहे. तसेच ९३-९४ चा डीएसआर ऑक्टो. ९३ मध्ये निघणार आहे व त्यात ५ ते ६ टक्क्यांनी वाढ निश्चित आहे. आम्ही दिलेली निविदा योग्य आहे.

मंडळातर्फे मे. शामा कन्स्ट्रक्शनच्या प्रतिनिधीस सांगितले की, आपणास सुरुवातीपासून एस्केलेशन देण्यांत येणार आहे व शेड्युल "अ" वर सिमेंटपुरवठाही करण्यांत येणार आहे. तसेच मंडळाने यापुर्वी याच ठिकाणाचे जे काम दिलेले आहे ते १९९१-९२ च्या दरसूचीच्या १६% जादाने दिलेले आहे. त्यामुळे आपण निदान तेवढयाच दरापर्यन्त खाली यावे. त्यांनी ते शक्य नाही असे सांगितले.

यानंतर मे. शामा कन्स्ट्रक्शन कं. मुंबई यांच्या प्रतिनिधीस विचारण्यांत आले की, आपण जी निम्नतम दराची निविदा दिलेली आहे त्या दरामध्ये आपण किती टक्के कमी करता यावर शामा कन्स्ट्रक्शन कं. च्या प्रतिनिधीनी सांगितले की, दिड टक्का कमी करतो.

यानंतर मंडळाने या विषयावर चर्चा केली व मंडळाच्या पदाधिका-याचे असे मत झाले की, मे. शामा कन्स्ट्रक्शन कंपनीच्या प्रतिनिधीने कमी केलेला दर हा विचारात घेतला तरीही त्यांना काम देणे मंडळास परवडणार नाही. तसेच प्रथम दिवसापासून देण्यांत येणारे स्केलेशन गृहीत धारता लाभार्थीवर जास्त किंमतीचा बोजा पडेल. सन १९९२-९३ च्या डीएसआर प्रमाणे काम करण्यास ठेकेदाराची तयारी दिसत नसल्यामुळे लाभार्थीवर जास्त किंमतीचा बोजा पडेल व गाळेधारकांचे हित लक्षात घेता निविदेची फोड करून दोन विभागात निविदा प्रसिध्द केल्यास जास्त कंत्राटदारांना निविदा भरण्याची संधी उपलब्ध होऊन स्पर्धात्मक निविदा येऊन दर कमी येण्याची शक्यता आहे.

निविदा रद्द करावी किंवा कसे यासंबंधी चर्चा चालु असतांना निम्नतम दराचे निविदाधारक मे. शामा कन्स्ट्रक्शन कंपनीचे प्रतिनिधी हे बैठकीतच मा. सभापती व मंडळाच्या सदस्यांना परत येऊन भेटले व २१.३५% या दराने काम करण्यास तयार असल्याचे सांगितले व तशा आशयाचे पत्र मंडळास सादर केले.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५०६ — दिनांक २८/९/१९९३

आर-२७ सिडको औरंगाबाद येथील मध्यम उत्पन्न गटातील ८८ गाळ्यांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदावर निर्णय घेण्यासाठी सदर विषय मंडळाच्या पुढील बैठकीसमोर ठेवावा.

...

विषय क्र. ९: आर-२६ सिडको औरंगाबाद येथील मध्यम उत्पन्न गटांतर्गत ६८ गाळ्यांच्या योजनेसाठी प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय घेणेबाबत.

या बाब टिप्पणीवर चर्चा करतांना मंडळाच्या पदाधिका-यांचे लक्षात आले की, ६८ गाळ्यांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेले निम्नतम दराची निविदा ही जास्त दराची आहे. त्यामुळे गाळ्यांच्या किंमतीत बरीच वाढ होणार आहे. त्यामुळे निम्नतम दराचे निविदाधारक मे. प्रकाश बिल्डर्स नाशिक यांचे प्रतिनिधीस मंडळासमोर वाटाघाटीसाठी बोलविण्यांत आले.

मे. प्रकाश बिल्डर्स नाशिक यांचे प्रतिनिधी वाटाघाटीसाठी मंडळासमोर हजर झाले व त्यांच्याशी त्यांनी दिलेल्या निविदेच्या दराबाबत चर्चा केली. त्यांना सांगण्यांत आले की, आपण जो दर नमुद केला आहे. तो जास्त आहे व त्या दरात काम देणे हे मंडळास परवडणार नाही. आपण दिलेला दर हा कमी करु शकता का अशी विचारणा त्यांना करण्यांत आली.

यावर मे. प्रकाश बिल्डर्स नाशिक यांचे प्रतिनिधी म्हणाले की, जो दर नमुद केलेला आहे तो वाजवी आहे. मंडळाचे निविदातील दर हे ९१-९२ चे आहेत, बाजार भाव वाढत आहे. १९९२-९३ चे दरसुची नुसार आम्ही भरलेली निविदा फक्त ५% पर्यन्त जास्त दराची आहे. ९३-९४ चा डीएसआर वाढत आहे असे त्यांनी मंडळास सांगितले. चर्चेअंती मे. प्रकाश बिल्डर्स यांच्या प्रतिनिधीनी १.२५% टक्के दर कमी करण्याची तयारी दर्शविली.

यावर मंडळाने मे. प्रकाश बिल्डर्स यांच्या प्रतिनिधीस सांगितले की, प्रथम दिवसापासून देण्यात येणारे एस्केलेशन गृहीत धरता सन १९९२-९३ च्या डीएसआर प्रमाणे इस्टीमेटे रेटने काम करावे यास मे. प्रकाश बिल्डर्स यांच्या प्रतिनिधी असमर्थता दर्शविली.

९८ गाळ्यांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदा या जास्त दराच्या असल्याने रद्द कराव्यात किंवा कसे अशी चर्चा चालु असतांनाच मे. प्रकाश बिल्डर्स यांचे प्रतीनिधीनी परत मा. सभापतींची बैठकीतच भेट घेतली, व त्यांनी विचाराअंती २१.३५% जादा या दराने काम करण्याची तयारी दर्शविली व तसे लेखी पत्र मंडळाकडे सादर केले.

या अनुषंगाने चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५०७ /१९. दि. २८.९.९३

या बाब टिप्पणीवर चर्चा करतांना मंडळाने असा निर्णय घेतला की, ९८ गाळ्यांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदावर निर्णय घेण्यासाठी सदरचा विषय मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवावा.

विषय क्र.५:आर ४३ सिडको औरंगाबाद येथील उच्च उत्पन्न गटांतर्गत ५० गाळ्यांच्या योजनेसाठी प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय घेणेबाबत.

या बाब टिप्पणीवर चर्चा करतांना मंडळाच्या निदर्शनास आले की, ५० गाळ्यांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदा या जास्त दराच्या आहेत. त्या स्विकारणे मंडळास अशक्य आहे. जर

निम्नतम दराची निविदा स्विकारल्यास गाळ्याच्या किंमतीत फार वाढ होणार आहे व लाभार्थीवर अधिकचा बोजा पडेल.

म्हणून या कामासाठी प्राप्त झालेली निम्नतम दराचे निविदाधारक मे. अमीत बिल्डर्स, औरंगाबाद यांना मंडळासमोर वाटाघाटीसाठी बोलविण्यांत आले. त्यांच्याशी निविदेच्या दराबाबत चर्चा केली. मंडळातर्फे मे. अमीत बिल्डर्स औरंगाबाद यांच्या प्रतिनिधीस सांगण्यांत आले की, आपण जो निविदेत दर नमुद केला आहे तो जास्त आहे. त्या दरात काम करणे हे मंडळास परवडणार नाही. त्यामुळे आपण काही दर कमी करु शकता का अशी विचारणा करण्यांत आली.

यावर मे. अमीत बिल्डर्स, औबाद यांच्या प्रतिनिधीनी सांगितले की, या गैळ्यांच्या बांधकामामध्ये दगडी काम आहे ते महाग आहे. तसेच इस्टीमेटमध्ये जे दरवाजे आहे, त्यांना व्हिनीअर लावयाचे आहे. त्यामुळे दर वाढला आहे. दगडाऐवजी विट वापरण्यास व दरवाज्यांना व्हिनिअर ऐवजी पेंटिंग करण्यास परवानगी दिल्यास दर कमी करणे शक्य आहे. तसेच त्यांनी सांगितले की, बाजार भाव वाढत आहे व ९३-९४ चे डीएसआर ऑक्टो. ९३ मध्ये प्रसिध्द होणार आहे त्या ९२-९३ च्या डीएसआरपेक्षा ५ ते ६ टक्केनी वाढ होणार आहे. मे. अमीत बिल्डर्स औरंगाबाद यांच्या प्रतिनिधीनी ०.६१ दर कमी करण्याची तयारी दर्शविली.

मंडळातर्फे मे. अमीत बिल्डर्स औ, बाद यांच्या प्रतिनिधीस सांगण्यांत आले की, प्रथम दिवसापासून देण्यांत येणारे एस्केलेशन गृहीत धरता ९२-९३ चे डीएसआरप्रमाणे इस्टीमेट रेटने काम करावे यास अनुसरुन मे. अमीत बिल्डर्स औरंगाबाद यांच्या प्रतिनिधीनी सांगितले की, पुन्हा ०.५० कमी करतो असे एकुण ०.६१+०.५०= १.११% कमी दराने काम करण्याची तयारी दर्शविली.

यानंतर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी चर्चा केली व ९२-९३ चे डी. एस. आर प्रमाणे इस्टीमेट रेटने ठेकेदार काम करण्यास तयार नसल्याने निविदा दोन विभागात विभागुन प्रसिध्द केल्यास अधिक निविदाधारक पुढे येऊन स्पर्धा वाढेल व दर कमी येतील. त्यामुळे हे काम दोन विभागात विभागावे अशी चर्चा चालु असतांना मे. अमीत बिल्डर्स औरंगाबाद यांनी मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांची बैठकीत येऊन परत भेट घेतली व त्यांनी सांगितल की, २१.३५% जादा या दराने काम करण्यास तयार आहे व तसे पत्र मंडळास सादर केले.

वरील चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५०८ दिनांक २८/९/१९९३

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, ५० उच्च उत्पन्न गट गाळ्यांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदेवर निर्णय घेण्यासाठी सदर विषय हा मंडळाच्या पुढील बैठकीसमोर ठेवावा.

विषय क्र. ६: औरंगाबाद महानगरपालिकेकडून आलेल्या राहूलनगर झोपडपट्टीतील सुधारणा कामाच्या प्रस्तावास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

---

या बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५०९ दिनांक २८/९/९३

औरंगाबाद महानगरपालिकेने सादर केलेले भाग-२ च्या अंदाजपत्रकास व पुर्वी प्रदान केलेल्या प्रशासकीय मान्यता धरुन कमाल खर्च मर्यादेच्या अधिन राहून रु. ११,०९,१६०/- ची सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे

विषय क्र. ७: मा. सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

---

विषय क्र. १: औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अविष्कार तथा लगतच्या योजनेच्या बाह्य सुविधांच्या उन्नतीकरण करण्याकरिता रु. ४४.०० लक्षाचे अनुदान मंजूरीबाबत.

---

या विषयावर मंडळाने साधकबाधक चर्चा करुन असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५१० दिनांक २८/९/१९९३

मंडळाच्या अविष्कार तथा लगतच्या योजनेच्या बाह्य सुविधाच्या उन्नतीकरीता प्राप्त झालेले रु.४४.०० लाखाचे अनुदान, महानगरपालिकेनें सदर वसाहतीतील सर्व बाह्य सुविधा हस्तांतरीत करुन घेतल्याशिवाय देऊ नयेत.

विषय क्र. २: एकनाथनगर औरंगाबाद प्राथमिक शाळेसाठी राखून ठेवलेला भूखंड म.न.पा.ला हस्तांतरीत करणेबाबत.

---

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५११ दिनांक २८. ९.९३

---

औरंगाबाद महानगरपालिकेने शाळेच्या भूखंडाची किंमत कळविलेल्या मुदतीत न भरल्याने मंडळाने व्याजाची आकारणी केली. सदरचे व्याज माफ करण्यांत यावे व भूखंडाचा ताबा महानगर पालिकेस देण्यांत यावा. तसेच महानगरपालिकेस कळविण्यांत यावे की, महानगरपालिकेने सदरच्या भूखंडाचा वापर फक्त शाळेसाठीच स्वत: करावा. तसेच सदर भूखंड इतर कोणा संस्थेस शाळेसाठी देऊ नये.

विषय क्र. ३: आर-२६ सिडको औरंगाबाद येथील ११२ गाळयांच्या बांधकामाचा दोष दुरूस्तीचा कालावधी कमी करण्याच्या प्रस्तावावर विचार करणेबाबत.

---

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने खालील प्रमाणे निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५१२ दिनांक २८/८/९३

---

आर-२६ सिडको औरंगाबाद येथील ११२ गाळयांच्या बांधकामाचा दोष दुरूस्तीचा कालावधी तीन वर्षावरून १ वर्षावर प्राधिकरणाच्या ठरावानुसार आणण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.

पटलावरील विषय संपल्याने उपस्थितींचे आभार मानून बैठक संपली.